महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

=====================================================================

जा.क्र.तशिविकापू/विवि/२०२०/ 2604

दिनांक :- 04 SEP 2020

परिपत्रक

प्रति,
संचालक /प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी/पदव्युत्तर पदवी तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ प्रवेशप्रक्रिया व इतर शैक्षणिक कामकाजाबाबत...

उपरोक्त विषयी या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी/पदव्युत्तर पदवी तंत्रशिक्षण संस्थांना सुचित करण्यात येते की, सद्या पुणे शहरामध्ये करोना-१९ विषाणुचा प्रसार व संसर्ग मोठया प्रमाणात होत असून याबाबत सर्वांनी आवश्यक ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. तसेच केंद्र शासनाने व राज्य शासनाने याबाबत प्रसिध्द केलेल्या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

सद्या या कार्यालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीताची पदवी/पदव्युत्तर पदवी प्रवेशप्रक्रिया बाबतचे व इतर शैक्षणिक कामकाज चालू असून त्या संदर्भात या कार्यालयास संस्थांचे प्रतिनिधी व विद्यार्थी/पालक भेट देत आहेत.

**याबाबत सर्व संस्थांना सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थेच्या शैक्षणिक / पदवी/पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रियेसंदर्भात काही अडचण असल्यास या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्याशी दूरध्वनी द्वारे संपर्क साधावा तसेच कागदपत्रे ईमेल द्वारे सादर करावीत. शक्यतो संस्थेच्या प्रतिनिधीस या कार्यालयामध्ये पाठवू नये. तसेच कार्यालयास भेट देणे आवश्यक असल्यास त्याबाबत पूर्वपरवानगी घ्यावी. जेणे करुन अनावश्यक गर्दी टाळता येईल.त्याच प्रमाणे विद्यार्थी / पालकांना या कार्यालयास भेट देण्याबाबत सूचित करु नये. सर्व संस्थांनी याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी .**

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे